महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व.का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :-महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक बांधका-०३२५/ प्र.क्र. १८१/ पोल-७, दि. १३/०१/२०२६

**विषय** :- पोलीस अधीक्षक,ठाणे (ग्रा.) येथील वाशिंद पोलीस ठाणे करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम हे जे.एस.डब्ल्यु स्टील कोटेड कंपनी यांच्या सी.एस .आर. फंडातुन करुन घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. बांधका०३२५/ प्र.क्र. १८१/ पोल-७ दि. १३/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०११३१४५१०८५०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 20-01-2026 17:31:59

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २७

प्रत :-

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा.) येथील वाशिंद पोलीस ठाणे करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम हे जे.एस.डब्ल्यु स्टील कोटेड कंपनी यांच्या सी.एस.आर. फंडातुन करुन घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्र. बांधका-०३२५/प्र.क्र.१८१/ पोल-७**

मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक: १३ जानेवारी २०२६.

**वाचा** :-१) गृह विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एपीओ ३१११/प्र.क्र.१०७(अ) /पु.बां.२/पोल-३, दि. ०४.०३.२०१४

२) अपर पोलीस महानिरीक्षक(नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/२७/वाशिंद पो.ठा./नवी. इमा. बांधकाम (ठाणे ग्रा) /२३/२०२१/२०२५, दि. १३.०१.२०२५ व २२.०४.२०२५.

३) जे.एस.डब्यु स्टील कोटेड प्रोडक्ट कंपनी यांचे पत्र क्र. जेएसडब्ल्यू/पिआर/०५०४२५/ २०२५, दि.०५.०४.२०२५

४) शासनाचे समक्रमांकाचे पत्र, दि. १८.०३.२०२५

५) पोलीस अधिक्षक, ठाणे(ग्रा) यांचे पत्र, जा.क्र. ठाग्रा/पशा-३/ वाशिंद पो. ठा इमारत बांधकाम / २७४७/२०२४, दि. ०८.१०.२०२४ व १७.०४.२०२५

**प्रस्तावना :-**

अपर पोलीस महानिरीक्षक(नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र. २ अन्वये पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा.) येथील वाशिंद पोलीस ठाणे करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे रु. ४,९५,३७,८२७ (रु. चार कोटी पंच्याण्णव लाख सदतीस हजार आठशे सत्तावीस) इतक्या खर्चाचे बांधकाम हे जे. एस. डब्यू स्टील कोटेड कंपनी यांच्या सी.एस. आर. फंडातुन करुन घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये काही मुद्द्यांच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह माहिती सादर करण्यास पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले होते. त्यानुसार संदर्भ क्र. ५ अन्वये पोलीस अधिक्षक, ठाणे(ग्रा) यांनी वस्तुस्थिती सादर केली आहे. उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील प्रस्ताव व संदर्भ क्र. ५ येथील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भ क्र. १ अन्वये गृह विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एपीओ ३१११/ प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४ अन्वये वाशिंद पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिली असून शासन अधिसूचना दि.२६.०३.२०१५ द्वारे वाशिंद पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्र घोषित करण्यात आले आहे.

२. सर्व्हे नं ७८/अ क्षेत्र ३९१७ चौरस मीटर (३९ गुंठे १७ आर) मोकळी जमीन वाशिंद पोलीस ठाणे बाजूस असून ती पोलीस विभागाच्या नावावर आहे. सदर जमिनीची उप अधीक्षक भुमी अभिलेख, शहापूर यांच्याकडून शासकीय मोजणी करण्यात आली असुन जागा पुर्णपणे पोलीस विभागाच्या ताब्यात आहे.

३. वाशिंद पोलीस ठाण्याची प्रशासकीय इमारत बांधकामासाठी जे.एस.डब्यु स्टील कोटेड प्रोडक्ट कंपनीच्या यांनी पब्लिक रिलेशन डिपार्टमेंटच्या फंडातुन संमती दर्शविली असून बांधकामाचा खर्च कंपनीच्या J.S.W. Foundation मार्फत करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. सदर बांधकामाचे रु. ४,९५,३७,८२७ (रु. चार कोटी पंच्याण्णव लाख सदतीस हजार आठशे सत्तावीस) इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक व बांधकामाचे नकाशे Edifice Consultant Pvt. Ltd कंपनीने तयार केले आहे.

४. महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी सुधारीत नियमावली २०२४ नियम ८(२)(ग)(२)(ब) मधील तरतुदीनुसार, "पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पुर्व मान्यतेने कोणत्याही कंपनीकडून नामांकित ट्रस्टकडून त्यांच्या सामाजिक दायित्व निधी (Corporate Social Responsibility) मधून पोलीस कल्याणकारी योजनांकरीता निधी घेता येईल तसेच इमारती बांधकाम अथवा साहित्य सामुग्री स्वरुपात मदत घेता येईल."

५. पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा.) येथील वाशिंद पोलीस ठाणे करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे रु. ४,९५,३७,८२७ (रु. चार कोटी पंच्याण्णव लाख सदतीस हजार आठशे सत्तावीस) इतक्या खर्चाचे बांधकाम हे जे.एस.डब्ल्यु स्टील कोटेड कंपनी यांच्या सी.एस.आर. फंडातून करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२६०११३१४५१०८५०२९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.01.13 14:53:12 +05'30'

**( चेतन निकम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा.).
३) असो.व्हा.प्रेसिडेंट-जे.एस.डब्यु स्टील कोटेड प्रोडक्ट कंपनी
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५) निवड नस्ती (पोल-७).